दूरध्वनी क्रमांक :
०२०-२५६०१२१८
०२०-२५६०१२०६

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

परीक्षा समन्वय विभाग
गणेशखिंड, पुणे ४११ ००७
Website : www.unipune.ac.in
e-mail : coe@unipune.ac.in

## परिपत्रक क्र. ११४

प्रति,

१. मा. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये
२. मा. संचालक, सर्व मान्यता प्राप्त संस्था
३. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग

**विषय :- उच्च शिक्षण घेणा-या दिव्यांग विद्यार्थ्यांना परीक्षेमध्ये सोयी - सवलती देणेबाबत.**

सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, सन २०१७ च्या प्रथमार्धातील आयोजित परीक्षांपासून उच्च शिक्षण घेणा-या दिव्यांग विद्यार्थ्यांना परिक्षेमध्ये सोयी - सवलती पुरविण्यासंदर्भात महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण -२०१६/प्र.क्र.३०२/विशि-३ दि. ०४ मार्च, २०१७ यांनी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाची प्रत सोबत जोडलेली आहे. (सोबत : शासन निर्णय दि. ०४ मार्च, २०१७ ची प्रत )

पुढे असेही कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांनी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार आपल्या महाविद्यालयात/संस्थेत/विभागात उच्च शिक्षण घेणा-या दिव्यांग विद्यार्थ्यांना परीक्षेमध्ये आवश्यक सोयी - सवलती देण्याबाबत उचित कार्यवाही करावी.

गणेशखिंड, पुणे- ४११००७.
जा. क्र. परीक्षा/ समन्वय/३१२
दिनांक : ११ मार्च, २०१७
१४

(डॉ. अशोक चव्हाण)
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव:

परीक्षा विभागातील सर्व उपकुलसचिव/ सहायक कुलसचिव

उच्च शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना
परिक्षेमध्ये सोयी-सवलती देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१६/प्र.क्र. ३०२/विशि-३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ०४ मार्च, २०१७.

**प्रस्तावना:-**

राज्यातील सर्व उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थामध्ये विशेष गरजा असणाऱ्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांचे अध्ययन, अध्यापन व मुल्यमापनाची पध्दती वेगळी असणे आवश्यक आहे. विषेश गरजा असणाऱ्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांना शैक्षणिक मुल्यमापनामध्ये गरजेनुरूप सोयी सवलती देण्यासंदर्भात धोरण निश्चितीसाठी शासन स्तरावरुन समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीच्या बैठकीमध्ये सर्व अकृषी विद्यापीठाचे परिक्षा नियंत्रक व दिव्यांगांशी संबंधीत असलेल्या विविध संस्थांचे तज्ञ प्रतिनिधी उपस्थित होते. सदरहू बैठकीमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणामध्ये येणाऱ्या अडचणी व परिक्षा पध्दतीमध्ये त्यांना दिल्या जात असलेल्या व आवश्यक असलेल्या सोयी सुविधांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली व त्यानुसार आवश्यक त्या सूचना व अभिप्राय मागविण्यात आले. प्राप्त अभिप्राय व सूचनांचा विचार करून उच्च शिक्षण/विद्यापीठीय शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना सोयी-सुविधा देण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. त्यानुसार खाली नमूद केल्याप्रमाणे शासन निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय:-**

विशेष गरजा असणाऱ्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांची खालीलप्रमाणे वर्गवारी आहे.

१. पूर्णत: अंध (Blindness)
२. अंशत: अंध (Low vision/ Partial Blind)
३. कुष्ठरोग निवारित ( Leprosy Cured Persons)
४. कर्णबधिर (Hearing Impairment - deft and hard of hearing )
५. लोकोमोटर डिसेबिलिटी अस्थिव्यंगासह (Locomotor Disability including Orthopedic disability)
६. शारिरीक वाढ खुंटणे (Dwarfism)
७. बौध्दिक अक्षम (मतिमंद/गतिमंद) (Intellectual Disability -Mentally challenged/Slow Learners)
८. मानसिक आजार (Mental Illness)
९. स्वमग्न (Autism Spectrum Disorder)
१०. सेरेब्रल पाल्सी (Cerebral palsy)
११. स्नायुंची विकृती (Muscular Dystrophy)
१२. मज्जासंस्थेचे तीव्र आजार (Chronic Neurological Conditions)
१३. अध्ययन अक्षम (Specific Learning Disabilities)
१४. बहुविध द्दधन अपदयरर (Multiple Sclerosis)
१५. भाषण (वाचा) व भाषा अक्षमत्व (Speech and Language Disability)
१६. थॅलस्सेमिया (Thalassemia)/ कॅन्सर (Cancer)
१७. हिमोफिलिया (Hemophilia)
१८. सिकल सेल आजार (Sickle Cell Disease)
१९. बहुविकलांग (Multiple Disabilities)